# प्रकरण दुसरे : साहित्याचे प्रयोजन

## १. प्रयोजन म्हणजे काय ? :

प्रयोजन म्हणजे हेतू किंवा उद्देश. असे दिसते की, मानवाकडून झालेली प्रत्येक निर्मिती ही कोणत्या तरी हेतूतून किंवा उद्देशातून झालेली असते. अगदी व्यावहारिक पातळीवर निर्माण झालेल्या अन्नपदार्थ, वस्त्रविशेष अशा दैनंदिन जीवनोपयोगी निर्मिती घेतल्या तरी त्यांची निर्मिती माणसाच्या प्राथमिक गरजांच्या पूर्तीच्या हेतूने झालेली आहे हे लक्षात येते. अन्न, वस्त्र आणि निवारा या ज्या माणसाच्या अत्यावश्यक प्राथमिक गरजा आहेत त्यांच्या पूर्तीच्या उद्देशातून व्यवहारोपयोगी वस्तूंची निर्मिती झालेली आहे. न. चिं. केळकर यांनी म्हटल्याप्रमाणे, ही माणसाच्या पोटाच्या पातळीवरील देवघेव आहे. निर्माता देत असतो आणि उपभोक्ता (ग्राहक) घेत असतो; पण त्यांच्या मते, कला ही काळजाच्या किंवा हृदयाच्या पातळीवरील (दुय्यम म्हणू अशी) देवघेव होय. इथेही कलावंत देत असतो आणि रसिक स्वीकारीत असतो.

एकूण कलाव्यापाराचा विचार करताना तीन केंद्रे संभवतात. निर्माता कलावंत हे एक केंद्र, कलाकृती हे दुसरे केंद्र आणि आस्वादक रसिक हे तिसरे केंद्र. या तिन्हींचा एकत्र विचार करताना प्रयोजन, हेतू किंवा उद्देश यांचा प्रश्न उद्‌भवतोच उद्‌भवतो. कलावंत कशासाठी कलाकृती निर्माण करतो आणि रसिक कोणत्या हेतूस्तव कलाकृतीचा स्वीकार करतो असे या प्रश्नाचे स्वरूप बनते.

अशा प्रश्नांची सोडवणूक म्हणजेच प्रयोजनाचा विचार होय. व्यवहारोपयोगी वस्तूंच्या बाबतीत प्रयोजनाचा विचार साधा, सरळ असतो. वस्त्रविशेषांची निर्मिती व स्वीकार 'शरीर झाकण्यासाठी किंवा शरीरसौंदर्याची खुलावट साधण्यासाठी' असे प्रयोजन चटकन सांगता येते; पण कलावस्तू किंवा साहित्यवस्तू यांच्या प्रयोजनाबाबत असे चटकन उत्तर देता येत नाही. लेखक / कवी साहित्यकृती का निर्माण करतो आणि तिचा स्वीकार रसिकवाचक का करतो याचे उत्तर गुंतागुंतीचे बनते. यामुळेच पौर्वात्य आणि पाश्चिमात्य समीक्षकांनी याबद्दल बरेच सांगूनही लेखक व वाचक या

दोन्ही दृष्टींनी साहित्य-प्रयोजनाचा नेमका खुलासा झालेला आहे असे दिसत नाही.

## २. स्वरूप व प्रयोजन यांचा परस्परसंबंध :

कोणत्याही वस्तूच्या स्वरूपाचा तिच्या प्रयोजनाशी निकटचा संबंध असतो असे दिसते. उदाहरणार्थ, कापडाचे एकंदर स्वरूप लक्षात घेऊनच त्याचे निर्मितिप्रयोजन सदरा, कोट, सतरंजी की पडदे हे नक्की होते. असेच सूत्र साहित्याला लावून साहित्यकृतीची प्रकृती वा स्वरूप लक्षात घेणे आणि त्या अनुरोधाने प्रयोजनाची निश्चिती करणे या मार्गाचा अवलंब केला गेलेला दिसतो. म्हणूनच 'काव्याची प्रयोजने अनेक आहेत. आपल्या स्वरूपाशी इमान राखणे हे महत्त्वाचे' असे प्रसिद्ध समीक्षक वेलेक् याने म्हटले आहे. समीक्षक प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्या मतेही साहित्याचे प्रयोजन त्याच्या प्रकृतीनुसारच निश्चित केले पाहिजे, अथवा करणे युक्त होईल. केवळ आपल्या अपेक्षेचा निकष लावणे चूक होईल. कारण 'ललितसाहित्य हे साधन नाही. ती एक अनन्यपरतंत्र, स्वयंभू, संपूर्ण आणि चैतन्यपूर्ण सृष्टी आहे. तिच्यावर आपल्या अपेक्षा लादू नयेत.'

वेलेक् आणि वॉरेन या समीक्षकांनी आपल्या 'साहित्य-सिद्धांत' (Theory of Literature) या ग्रंथात म्हटले आहे, 'काव्याची प्रकृतीच त्याचा उपयोग ठरवीत असते... वस्तूकडून साधले जाणारे कार्य म्हणजेच ती वस्तू! कोणत्याही कलावस्तूची जडणघडण तिच्या प्रयोजनकार्यानुसारच केली जात असते आणि कालमान, साधनांची उपलब्धता व अभिरुचीच्या दृष्टीने इष्ट अशा अपेक्षा यानुसार त्या वस्तूला साह्यभूत होणाऱ्या उपांगांची जोड दिली जात असते. एखाद्या साहित्यकृतीत, साहित्याच्या प्रयोजनाच्या दृष्टीने अनावश्यक पण एकंदरीत मनोवेधक व अन्य कारणास्तव समर्थनीय असा बराच भाग असू शकतो' - (अनुवाद : डॉ. स. गं. मालशे.)

या समीक्षकांनी पुढे होरेस या समीक्षकाच्या मताचा हवाला देऊन काव्यस्वरूपाचे निदान नेमकेपणे केले आहे. 'काव्य हे सुंदर व उपयुक्त असते' हे होरेसचे मत. तसे पाहायला गेले, तर सुंदरता आणि उपयुक्तता यांना एकत्र अजमावणे ही एक द्वंद्वात्मक कल्पना आहे. वेलेक् आणि वॉरेन यांच्या मते यापैकी एकेक विशेषण सुटे घेऊन काव्यामागे लावल्यास प्रयोजनासंबंधीचे अगदी टोकाचे परस्परविरोधी गैरसमज संभवू शकतात. 'सुंदर' म्हणजे जे कंटाळा आणीत नाही ते, केवळ कर्तव्यकर्म नव्हे ते, स्वयमेव फलश्रुतिरूप आहे ते आणि 'उपयुक्त' म्हणजे ज्यात कालापव्यय होत नाही ते, केवळ कालक्षेपाचा प्रकार नव्हे ते, काहीतरी गंभीर दखल घेण्याजोगे – असे वॉरेन आणि वेलेक् यांनी 'सुंदर' व 'उपयुक्त' या दोन शब्दांचे अर्थही सांगितले

आहेत. त्यांच्या मते या दोन्ही संज्ञा सुटच्या करून घेतल्या गेल्यामुळेच आनंदबोध, मतप्रचार-शुद्ध प्रतिमासृष्टी किंवा नाद/क्रीडाकृती (कारागिरी) अशी प्रयोजनाबद्दलची परस्परविरोधी द्वंद्वे निर्माण झालेली आहेत. म्हणून 'एखादी साहित्यकृती प्रयोजनदृष्ट्या जेव्हा पूर्ण यशस्वी होते तेव्हा तिच्यामध्ये आनंद व उपयुक्तता हे दोन्ही सूर एकसाथ जुळून आलेले असतात. एवढेच नव्हे, तर ते तिच्या ठायी पूर्ण एकजीव झालेले असतात. आपल्या (सारख्या आस्वादकाला झालेल्या) विविध प्रकारच्या आनंदाची यादी भली मोठी होईल; पण साहित्यानंद हा काही त्या यादीतील नुसता आपणांस पसंत पडलेला एक आनंद नव्हे, तर तो एक वेगळा उच्चतर आनंद आहे, असे आपण ठामपणे प्रतिपादिले पाहिजे. कारण निरपेक्ष चिंतनासारख्या उच्चतर क्रियेपासून तो मिळत असतो व साहित्याची उपयुक्तता, त्याची बोधप्रदता, त्याचे गांभीर्य म्हणजे सुद्धा एक प्रकारची आनंदप्रद गोष्टच असते... हे गांभीर्य सौंदर्यात्म असते, प्रत्यक्षानुभूतीच्या स्वरूपाचे असते, असे या समीक्षक-द्वयाने म्हटलेले आहे.

प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनीही जीवनानुभूती व आनंद असे दोन घटक या संदर्भात सांगितले आहेत. 'सुंदर', 'उपयुक्त', 'जीवनानुभूती', 'आनंद' या प्रयोजनांच्या संदर्भात काव्यस्वरूपाची निश्चिती करणाऱ्या अशा संज्ञा शेवटी व्यापकार्थाने दोन मूल्यगटात मोडताना दिसतात. 'सुंदर', 'सौंदर्य' आणि 'आनंद' या संज्ञा कलामूल्य वा सौंदर्यमूल्य यांचीच सूचना देतात, तर 'जीवनानुभूती' आणि 'उपयुक्तता' या संज्ञा जीवनमूल्यांचीच सूचना देतात. वा. लं. च्या मते अखेरीस या सर्वांची समाप्ती एका 'उच्चतर आनंदा'त अपेक्षित असते.

जीवनानुभवांची सूक्ष्मता, खोली व व्यापकता, त्यांची हाताळणी, सूचकता, अनेकार्थता, सौंदर्याचे भान असणारी कलात्मकता इत्यादी विशेषांनी सिद्ध होणाऱ्या कलाकृतींच्या स्वरूपांचा विचार करून आपण त्यांची प्रयोजने निश्चित करत असतो. यावरूनच 'घटकाभर करमणुकी' करता, 'वास्तवाचा विसर पाडण्या' करता, 'वासना चेतविण्या' करता, 'विशिष्ट मतप्रचारा'करता, किंवा 'उच्चतर कलात्मक आनंदा'करता अशी साहित्याची अनेक प्रयोजने कल्पिली जातात आणि अशा प्रयोजनांच्या आधारेच त्यांचे वर्गीकरण केले जाते.

या साऱ्या विवेचनावरून लक्षात येते की, एकंदरीने साहित्यकृतीचे स्वरूप आणि तिचे दुहेरी (म्हणजे लेखक व वाचक यांच्या बाबतीतील) प्रयोजन यांच्यात निश्चित असे एक नाते असते, एक परस्परसापेक्ष संबंध असतो.

### ३. प्रयोजन व परिणाम यातील भेद :

ललितसाहित्याच्या बाबतीत अनेकदा त्याचे संभवणारे परिणाम आणि (त्यावरून त्यांचे गृहीत धरले जाणारे) प्रयोजन यांच्यात गल्लत केली जाते. वास्तविक परिणाम आणि प्रयोजन या दोन्ही संज्ञा पूर्णपणे भिन्न असूनही त्या समानार्थक मानल्या जातात. विशेषतः हा प्रकार साहित्यातील श्लीलाश्लीलतेसंबंधीची चर्चा करताना मोठ्या प्रमाणात दिसतो. अनीती फैलावते, वाचकांच्या मनावर विपरीत परिणाम होतो म्हणून स्त्री-पुरुषसंबंधाच्या उघड्या चित्रणाला बंदी घालण्याची सर्रास मागणी करण्यात येते. इथे जणू काही त्या लेखकाचे प्रयोजनच अनीती वा स्वैराचाराची शिकवण आहे असे समजले जाते. एखाद्या साहित्यकृतीत अनावश्यक स्वरूपात अशी चित्रणे आली तर त्याबद्दलची तक्रार समर्थनीय ठरू शकेल; पण कथाविश्वाची अपरिहार्य गरज म्हणून किंवा कलाकृतीच्या स्वरूपाचा एक महत्त्वाचा घटक म्हणून असे चित्रण आले तर त्याबद्दल फारशी हरकत राहावयाला नको. साहित्यकृतीबद्दलचा लेखकाचा संकल्पित व्यूह या संदर्भात प्रमाण किंवा महत्त्वाचा मानायला हवा. अलेक्झँडर कुप्रीन या रशियन लेखकाची ‘यामा’ ही कादंबरी उदाहरण म्हणून घेता येईल. त्यात रशियन वेश्यागृहातील विश्वाचे चित्रण केलेले असून, नायिका यामा ही एक वेश्या आहे. तेव्हा अपरिहार्यपणे या कादंबरीत अवैध स्त्री-पुरुषसंबंधाची चित्रणे येतात आणि त्याबद्दल खरी तक्रार करायला वाचकाला वा समीक्षकाला जागा राहत नाही. कारण हे जगच असे आहे की, ज्यात सर्वार्थाने सुरक्षित असणाऱ्या जगाला फक्त अनीतीचेच दर्शन घडणार; पण वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहिले तर अनीती हीच या विश्वाची शास्ती नीती आहे हे लक्षात येऊ शकते. तिचे दर्शन न घडविणे हाच इथे अप्रामाणिकपणा झाला असता.

विशिष्ट परिणामांची अपेक्षा ठेवून लिहिले जाणारे साहित्य असत नाही असे नाही. तिथे परिणाम व प्रयोजन समानार्थक बनलेले असतातही; पण अशा साहित्याला प्रचारी साहित्यच म्हटले जाते. त्यात एखादे तत्त्व, भूमिका यांचा प्रसार व्हावा अशी अपेक्षा असते. साहित्य हे इथे साधनच बनविलेले असते. स्टालिनच्या काळातील बहुतेक रशियन साहित्य हे असेच आहे. साम्यवादाचा प्रसार करण्यासाठीच त्याची निर्मिती साधली गेली आहे आणि त्यामुळे प्रचारकी भाटगिरीचा निर्जीवपणाही त्यात उतरला आहे.

आपल्याकडील हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक व ऐतिहासिक कांदबऱ्यांनी केलेल्या परिणामामुळे अनुक्रमे सामाजिक सुधारणा आणि राष्ट्रीयस्मृतिसंचलन या दोन गोष्टींना मोठीच मदत झाली असे सांगण्यात येते आणि तसे झालेले दिसतेही; पण असे परिणाम घडविण्यासाठी हरिभाऊंनी लेखन केले असे म्हणणे गैर ठरेल. त्यांनी

कादंबऱ्या लिहिल्या त्या कादंबऱ्या लिहायच्या म्हणून. कादंबरीलेखन हेच त्यांचे साध्य होते, साधन नव्हे. सामाजिक वा राजकीय प्रबोधन घडविणे हे त्यांच्या लेखनाचे प्रयोजन नव्हते. वाचकांचे तसे प्रबोधन झाले हा त्यांच्या लेखनाचा एक आनुषंगिक परिणाम झाला इतकेच. हेच गो. ब. देवल यांचे 'शारदा' नाटक, केशवसुतांच्या सामाजिक कविता किंवा श्री. कृ. कोल्हटकर यांचा 'सुदाम्याचे पोहे' हा विनोदी लेखसंग्रह या साहित्याबद्दल म्हणता येईल. रूढिग्रस्त समाजाचे दोष दाखविणे आणि नव्या कालोचित सुधारणांच्या स्वीकाराची प्रेरणा देणे हे कार्य अशा साहित्याकरवी घडलेले आहे हे खरे, पण ते कार्य करण्यासाठीच हे साहित्य निर्माण झालेले नाही हेही तितकेच खरे!

प्रयोजन आणि परिणाम यातील भेद वरील विवेचनामुळे स्पष्ट होईल. प्रयोजनात विशिष्ट हेतूची कल्पना समाविष्ट झालेली असल्याने एक ठाम असा निश्चितपणा साहित्यकृतीच्या स्वरूपात संभवतो. परिणामाबाबत असा निश्चितपणा सांगता येत नाही. परिणाम म्हणजे साहित्यकृती करीत असलेले संस्करण असते. ज्या (वाचकरूपी) व्यक्तिमनावर असे संस्कार होत जातात त्या व्यक्तिमनाची पूर्वतयारी, क्षमता, अभिरुचीची पातळी इत्यादी गोष्टींवर या संस्काराचे स्वरूप बरेच अवलंबून असते. एखाद्या साहित्यकृतीचा वेगवेगळ्या वाचकावर वेगवेगळा परिणाम होतो, त्यात भिन्नत्व तसेच तीव्रतेचा फरक जाणवतो तो यामुळेच. एकच एक परिणाम असा प्रकार असता तर ना. सी. फडक्यांच्या कादंबऱ्या वाचणारे सारेच प्रणयप्रवीण झाले असते किंवा सावरकरांची कविता वाचणारे सर्वच वाचक क्रांतिकारक देशभक्त बनले असते. तसेच आधुनिक रशियन साहित्य वाचणारे सर्व साम्यवादी झाले असते!

सतत चर्चिल्या जाणाऱ्या काही प्रयोजनांचा नेमका विचार करण्याआधी आतापर्यंत विवेचिलेल्या भागाचा समारोप प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्या एका उताऱ्याने योग्यपणे केल्यासारखा होईल. 'ललित वाङ्मयाचे प्रयोजन' या लेखात ते लिहितात, "ललितसाहित्याचा अवतार मूलतः कशासाठी असतो हा सर्वप्रथम प्रश्न – दैनंदिन जीवनाचा विचार, ऐहिक जीवनातील उणिवांची भरपाई, इच्छातृप्ती, पुनःप्रत्यय, बोध, दडपलेल्या इच्छा-आकांक्षांचे चलन, अपूर्व व अशक्य अनुभवांची प्राप्ती, नव्या माहितीमुळे होणारी जिज्ञासातृप्ती इत्यादींची प्राप्ती वाचनामुळे होऊ शकते. असे हेतू मनात धरून साहित्याकडे वळता येते. त्यांची तृप्ती झाली नाही की मग ललितलेखनच नीट कामगिरी बजावीत नाही असे म्हटले जाते; पण यासाठी साहित्याची निर्मितीच होत नसते. कला हे हेतुपूर्तीचे साधन नव्हे."

### ४. काही साहित्य-प्रयोजने :

**१. यश :** हे मम्मट या संस्कृत समीक्षकाने सांगितलेल्या साहित्याच्या प्रयोजनांपैकी एक होय. यश, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, अशुभनिवारण, पत्नीप्रमाणे प्रेमयुक्त उपदेश आणि उच्चतर आनंद अशी सहा प्रयोजने त्याने त्याच्या 'काव्यप्रकाश' या ग्रंथात सांगितलेली आहेत.

यश किंवा कीर्ती हे मम्मटाने काव्याचे सर्वप्रथम प्रयोजन मानलेले आहे असे दिसते. हे प्रयोजन कवीच्या संदर्भात विचारात घ्यावे असे आहे. काव्यलेखनामुळे कवीला कीर्ती मिळते, प्रसिद्धी प्राप्त होते हे उघडच आहे. चार लोकांत आपले नाव व्हावे ही माणसाची एक जन्मजात अपेक्षा असते. अगदी लहान मुलालाही त्याच्याकडे मोठ्या माणसांचे दुर्लक्ष झालेले चालत नाही. काहीही करून ते इतरांचे लक्ष आपणाकडे वेधून घेते. वेगळ्या संदर्भात मोठेपणीही ही प्रवृत्ती टिकते. तेव्हा मानवी जीवनात प्रसिद्धी, यश आणि कीर्ती मिळविण्यासाठी साहित्यलेखन होते असे म्हटले जाते.

पण एका मर्यादेपर्यंतच काव्यलेखनाचे प्रयोजन म्हणून यश वा कीर्ती यांचा निर्देश करता येईल. जुन्या राजाश्रयाच्या काळात काव्यलेखनामुळे राजकवीची जागा एखादा कवी वा लेखक मिळवू शकत असे. आजही लेखकांना शासकीय पुरस्कार मिळतात. लक्षणीय लेखन असेल तर त्या लेखकाचा बोलबालाही होतो.

पण एकूण साहित्यनिर्मितीच प्रसिद्धीसाठी होते असे म्हणणे योग्य होणार नाही. केवळ कीर्ती मिळवायची आहे म्हणून कुणी लेखनाला बसत नाही. जुन्या काळातील ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम आदी संतकवी आणि अर्वाचीन काळातील केशवसुत, बी, बालकवी आदी कवी यांनी फक्त यशासाठी, कीर्तीसाठी काव्यलेखन केले असे म्हणणे त्यांच्या बाबतीत अन्यायाचे ठरेल.

उलट असेही दिसते की, असांकेतिक व नव्या वळणाचे लेखन केल्यामुळे अनेक कवी व लेखकांना मोठा त्रासच सहन करावा लागला आहे. माधव ज्यूलियन या कवीला त्याच्या निराळ्या ढंगाच्या मुक्त प्रेमकाव्यलेखनामुळे प्रसिद्धी वा यश न मिळता 'प्रणय पंढरीचा वारकरी' असे कुचेष्टेचे बिरूद पत्करावे लागले. बा. सी. मर्ढेकर यांना तर अश्लील लेखनाच्या आरोपाला कोर्टापर्यंत तोंड द्यावे लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या नवकथा, नवकाव्य, न(व)नाट्य, नवचित्रकला यांना फार मोठ्या प्रतिकूल टीकेला तोंड द्यावे लागले. लौकिक वा यश राहोच, पण नवसाहित्याच्या उपासकांना जबर हेटाळणी सहन करावी लागली. उलटच्या अर्थानेच त्यांना प्रसिद्धी मिळाली, तरीही ते लिहीत राहिले आणि आपल्या नवलेखनाला त्यांनी प्रतिष्ठाही प्राप्त करून दिली. निव्वळ यशाखातर लेखन घडत असते तर असे झालेच

नसते. इतकेच नव्हे, तर साहित्याने त्या त्या काळात घेतलेली नवी वळणेही दिसली नसती. एकूण साहित्यप्रांतात एक भयानक असा निष्प्राण तोचतोपणा निर्माण झाला असता.

तेव्हा यश हे प्रयोजन फार मर्यादित अर्थाने घ्यावे लागेल. वाटल्यास त्याला पूरक वा आनुषंगिक प्रयोजन म्हणता येईल. साहित्यकृती यशस्वी होऊन कीर्ती मिळाल्याच्या आनंदात लेखकाकडून आणखीही चांगले लिहिण्याची इच्छा बळावू शकते. वसंत कानेटकर, जयवंत दळवी, गो. नी. दांडेकर, नारायण सुर्वे, ना. धों. महानोर वगैरे लेखक-कवींनी प्रारंभी मिळालेल्या प्रसिद्धीच्या जोरावर नंतर चांगले लेखन केलेले दिसते; पण त्यांनीही लौकिक मिळविण्यासाठी लेखन केले असे म्हणता येणार नाही.

वाचकाच्या बाजूनेही यशासाठी वाचन असा मुद्दा मांडता येईल. चांगले वाचन असणाऱ्या व्यक्तीत एक बहुश्रुतपणा येतो आणि त्याला समाजात मान्यता मिळते, चारचौघे त्याचे बोलणे काळजीपूर्वक ऐकतात असे दिसते; पण असा लौकिक मिळविण्यासाठी वाचक साहित्याचे वाचन करतो असेही म्हणता यावयाचे नाही. तो वाचनाची आवड म्हणून वाचतो आणि वाचनामुळे त्याला मान लाभतो. हासुद्धा वाचनाचा एक आनुषंगिक लाभ आहे. ते वाचनाचे प्रयोजन म्हणता यायचे नाही.

**२. अर्थ :** अर्थप्राप्ती हेही मम्मटाने सांगितलेल्या प्रयोजनांपैकी एक आहे. आपले ऐहिक जीवन सुखासमाधानाचे बनवायचे असेल तर माणसाला पैशाअडक्याची जरुरी असते. आपल्या ठिकाणी वसणाऱ्या श्रम किंवा कसबाच्या जोरावर माणूस अर्थप्राप्ती करून घेत असतो. पैशाच्या मोबदल्यात आपले कसब, आपले श्रम विकणे हे माणसाच्या बाबतीत पुरातन काळापासून चालत आलेले आहे. ते लक्षात घेऊनच कवी वा लेखक यांच्या बाजूने सांगितले जाणारे हे प्रयोजन होय.

कलावंताने अर्थप्राप्तीसाठी आपल्याजवळचे कलाकौशल्य पणाला लावणे यात काहीही गैर नाही. कलेच्या जोरावर उपजीविका करणाऱ्या जुन्या मराठी शाहीर कवींचा या संदर्भात नेहमी उल्लेख केला जातो. राजकवीपद आणि त्यायोगे सर्व सुविधा काव्याच्या जोरावर मिळविणाऱ्या कवींचा उल्लेखही या संदर्भात आपण करू शकू. कारण कवी, कलावंत हा शेवटी माणूसच असतो. त्यालाही घर, परिवार असतो. चार इतर माणसांसारख्याच त्याच्याही गरजा असतात आणि त्या भागवायला पैसा लागतो. भीमसेन, कुमार गंधर्व यांच्यासारखे गायक आणि बिसमिल्ला, रविशंकर यांच्यासारखे वादक मोठ्या बिदागीशिवाय कार्यक्रम करीत नाहीत असेही सांगितले जाते. तसेच बेंद्रे, अलमेलकर, देऊस्कर, हुसेन अशा नामवंत चित्रकारांच्या चित्रांनाही मोठी किंमत

मोजावी लागते.

हे असे सर्वत्र दिसत असले तरी केवळ अर्थप्राप्ती हे कलेचे किंवा साहित्यनिर्मितीचे प्रयोजन होऊ शकत नाही. आज रविशंकरसारखा सतारिया किंवा शिवकुमार शर्मांसारखा संतूरवादक एका कार्यक्रमाचे हजारो रुपये घेत असला तरी असे पैसे मिळविण्यासाठी त्यांनी वादनविद्या संपादन केलेली नसते / नाही.

इतर कलांच्या तुलनेत कमी असले तरी निव्वळ साहित्यनिर्मितीवर गुजराण करणारे लेखक आहेतच. उदा.. मराठीत सुहास शिरवळकर किंवा गुरुनाथ नाईक असे लेखक आहेत. लेखन हा त्यांचा व्यवसाय बनलेला असतो. अशा लेखकांच्या लेखनाचे प्रयोजन अर्थप्राप्ती म्हणता येईल; पण सर्वच साहित्याबद्दल असे म्हणता यायचे नाही. नियतकालिकातून छापल्या जाणाऱ्या साहित्यास मोबदला / मानधन देण्याची पद्धती अलीकडे रूढ झालेली असली तरी मागच्या काळात ती नव्हती; पण त्या काळातही लेखनाची निर्मिती मोठ्या प्रमाणात झालेली दिसते. ज्ञानेश्वर, तुकारामादी संतांचे राहो, पण केशवसुत, बी, बालकवी इत्यादी अर्वाचीन कवींना काव्यलेखनामुळे कितीशी अर्थप्राप्ती झाली असावी हा प्रश्नच आहे.

तेव्हा लेखकाच्या दृष्टीने सांगितले जाणारे अर्थप्राप्ती हे प्रयोजनही फार तर पूरक वा आनुषंगिक म्हणता येईल असेच आहे. वाचकाच्या दृष्टीने ते संभवत नाही आणि वाचकाला ते चिकटवायचेच तर फार ताणावे लागेल.

**३. आत्माविष्कार :** दर्शनी स्वरूपात आत्माविष्कार हे लेखकनिष्ठ प्रयोजन आहे. साहित्यकृतीतून लेखक आपले अनुभव व्यक्त करीत असतो. या अनुभवांचे स्वरूप आपण या आधी पाहिलेले आहेच. अनन्यसाधारणत्व आणि सर्वसाधारणत्व असे त्याचे दोन महत्त्वाचे विशेषही आपण पाहिले आहेत. त्या त्या साहित्यकृतीतून व्यक्त होणारा तो तो अनुभव त्या त्या विशिष्ट लेखक (व्यक्ति)मनाचा आहे, याचे भान राखूनच सर्वांचा बनत असतो. यातील 'त्या त्या व्यक्तिमनाचा' हा जो पूर्वार्ध आहे त्याच्याशी आत्माविष्काराची संकल्पना जोडली गेली आहे.

आपला अनुभव व्यक्त करीत असताना लेखक स्वानुभवासह आत्माविष्कार साधत असतो. त्याद्वारा तो आपले व्यक्तिमत्त्वच प्रकट करीत असतो असे सांगण्यात येते.

आत्माविष्कार – Self expression – ही संकल्पना पाश्चात्त्य समीक्षेतून आपल्याकडे आलेली आहे. युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीनंतर व्यक्तिवादी संकल्पना जोरावली. समाजातील एक घटक असणाऱ्या व्यक्तीचे व्यक्ती म्हणून असणारे महत्त्व मानले जाऊ लागले. अशा तऱ्हेने व्यक्तिमत्त्वाच्या जाणिवा, विचार, दृष्टिकोण, विकसन

यांचे स्वातंत्र्य प्रतिपादिले जाऊ लागले. फ्रेंच राज्यक्रांतीतून प्रतिष्ठा पावलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मूल्यत्रयीमुळे तर व्यक्तिवादाच्या संकल्पनेस आणखी आधार मिळाला. जीवनाच्या हरेक क्षेत्राचा व्यक्तिमाहात्म्याच्या आधारे विचार होऊ लागला. कलेच्या क्षेत्रातही कलाकृतीच्या निर्मितीमागे उभी असलेली कलावंत ही व्यक्ती त्यामुळे वेगळ्या तऱ्हेने प्रकाशात आली. कलाकृतीद्वारे व्यक्त होणारा कलावंत नव्याने लक्षात घेतला जाऊ लागला.

आत्माविष्कारास साहित्याचे प्रयोजन मानले जाते. त्यामागेही एक अशी सलग भूमिका आहे. एक तर प्रत्येक साहित्यकृती ही एका व्यक्तिमनाने निर्माण केलेली असते. त्यामुळे तो एक मानसिक व्यवहार असतो. मानसिकतेमुळेच कलाकृतीचे स्वरूप यांत्रिक वा साचेबंद उत्पादनाचे नसते. यंत्रनिर्मित वस्तूवर जसा निर्माणकर्त्या यंत्राचा किंवा यंत्रामागे उभ्या असलेल्या व्यक्तीचा ठसा नसतो तसा प्रकार साहित्यकृतीबाबत होत नाही. साहित्य अशी वस्तू असते की तिच्या अंगांगावर निर्मात्या मनाचे ठसे सतत दिसत, जाणवत असतात. यामुळेच सामाजिक वळण एकच असले तरी केशवसुत, बी किंवा रेंदाळकर यांच्या कविता वेगळ्या दिसतात याचे कारण त्यांच्या निर्मात्या मनांच्या स्वतंत्र मानसिकतेत सापडते.

दुसरी गोष्ट जास्त महत्त्वाची आहे. कवी काव्यलेखन करतो ते त्याला जाणवलेल्या भावसत्याच्या आविष्कारासाठी. ते व्यक्त करण्याशिवाय त्याच्या कविव्यापारामागे दुसरा कोणताही हेतू नसतो. हे सूत्र हाताशी धरूनच डॉ. ब्रॅडलॉ या समीक्षकाने ' कलेसाठी कला ' हा सिद्धान्त मांडला. यातही त्या सत्याचे स्वरूप शास्त्रीय सत्याप्रमाणेच केवळ नसते, व्यक्तिनिरपेक्ष नसते. ' कवीला प्रतीत झालेले, जाणवलेले किंवा सांगण्यासारखे वाटलेले सत्य ' हे त्याचे शब्द या संदर्भात महत्त्वाचे आहेत. स्वतःला जाणवलेले सत्य स्वतंत्रपणे कवी जेव्हा सांगतो तेव्हा त्या सत्याला लगटून तो स्वतःलाही व्यक्त करीत असतो. म्हणजेच तो एक अप्रत्यक्ष आत्माविष्कार साधत असतो. आवड, निवड, विचार, दृष्टिकोण, जीवनविषयक तत्त्वज्ञान, जीवनाबद्दलच्या अपेक्षा, अभ्यास, पूर्वतयारी इत्यादींनी बनलेले त्याचे स्वतःचे असे जे खास व्यक्तिमत्त्व असते ते साररूपाने अप्रत्यक्षपणे त्याच्या साहित्यकृतीतून व्यक्त होते.

हे सारे व्यक्त केल्याशिवाय लेखक / कवीला चैन पडत नाही. म्हणून आत्माविष्कार हे साहित्याचे प्रयोजन ठरते. अपरिहार्यपणे तो त्याच्या अनुभूतींना एका विशिष्ट रूपबंधात व्यक्त करतो. ही प्रक्रिया माणसाच्या निर्मितिक्षम किंवा सर्जनशील प्रवृत्तीमुळेच घडते.

हे प्रयोजन वाचकनिष्ठही समजले जाते. रसिक हा मुका कलावंत असतो आणि

कलावंत हा मुका रसिक असतो असे म्हटले जाते. म्हणजे दोघांच्याही ठिकाणी सौंदर्यवृत्ती असते. फक्त कलावंत ती व्यक्त करू शकतो. रसिकाला ती व्यक्त करता येत नाही इतकेच ! तेव्हा रसिकाच्या ठिकाणीही निर्मितीची सुप्त सर्जनशील प्रेरणा वास करीत असतेच. आस्वादाच्या निमित्ताने जेव्हा तो साहित्यविश्वात प्रवेश करतो तेव्हा त्याच्या अशा सर्जकतेला, परिणामी आत्माविष्काराला वाव मिळतो. तो स्वतःच्या कलाने कलाकृतीची अर्थसंगती लावीत जातो. हाच त्याचा आत्माविष्कार. भिन्न भिन्न आस्वादकांच्या मनात एकाच कलाकृतीची भिन्न भिन्न अर्थरूपे संभवतात ती त्या त्या आस्वादक रसिकांच्या आत्माविष्काराच्या प्रक्रियेमुळेच !

अलीकडच्या काळात साहित्यनिर्मिती आणि साहित्यास्वाद यांच्याबद्दल एक वेगळाच विचार मांडला जाताना दिसतो, तो म्हणजे आत्मशोधाचा. असे म्हटले जाते की, निर्माता अनुभवांच्या निमित्ताने साहित्यकृतीच्या रूपाने स्वतःचाच शोध मूर्त करीत असतो आणि आस्वादकसुद्धा साहित्यकृतीची संगती लावताना अशीच स्वतःच्या शोधांचीच एक प्रक्रिया पुरी करीत असतो. म्हणजे या दोन्ही बाजूंनी स्वतःला जास्त जास्त स्पष्ट करीत जाणे, सुमूर्त करीत जाणे असाच व्यवहार होत असतो. पर्यायाने हा आत्माविष्कारच होय.

४. **स्वप्नरंजन** : पलायनवादाच्या संकल्पनेतून निर्माण झालेले साहित्य-प्रयोजन म्हणजे इच्छापूर्ती किंवा स्वप्नरंजन होय. ते प्रामुख्याने पाश्चात्त्य विचारसरणीतून आपल्याकडे आले. 'पुनःप्रत्यया'चा सिद्धात मांडणाऱ्या प्रा.ना.सी.फडके यांनी या प्रयोजनाचाच पुरस्कार केला आहे. नैराश्यवाद सांगणारा सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ शॉपेनहोअर याच्या विचारसरणीत या संकल्पनेची मुळे असल्याचे दिसते. त्याच्या मते मानवी जीवन दुःखमय असून ती दुःखे माणसाच्या वासनातृप्तीसाठी केल्या जाणाऱ्या धडपडीतून संभवतात. वासनेवर विजय मिळविला तर माणूस या दुःखपाशातून मुक्त होऊ शकतो. विश्वातील सर्व प्राणिमात्राशी व्यापक सहानुभावाने तादात्म्य पावणे आणि संन्यस्त वृत्तीने वासनांचा क्षय घडवून आणणे हाच वासनेवर विजय मिळविण्याचा चिरंतन उपाय आहे. त्याने सांगितलेला आणखी एक उपाय म्हणजे 'कलासृष्टी'हा आहे. कलासृष्टीत पार बुडून गेल्यामुळे अपेक्षित तादात्म्य आणि तज्जन्य वासनाविजय साधता येतात.

मानवी जीवनाची दुःखमयता ही एक सर्वपरिचित वस्तुस्थिती आहे. तुकारामाने तर 'सुख पाहता जवापाडे। दुःख पर्वताएवढे' असे म्हटले आहे. माणूस सतत हा दुःखाचा वेढा चुकवायचा प्रयत्न करीत असतो; पण ते शक्य होत नाही. त्यामुळे तो सतत अतृप्त व अस्वस्थ असतो. आपल्या जीवनात जे घडावे असे त्याला सतत वाटत असते, ते घडत नसल्याने तो कष्टीही होत असतो. दैनंदिन जीवनापासून तो

दूरही जाऊ शकत नाही. तेव्हा जीवनातही राहायचे आणि दुःखही टाळायचे अशा दुहेरी आपत्तीत तो सापडलेला असतो. त्या दुःखापासून पळण्याचा, पलायनाचा त्याचा शोध मात्र सतत चालू असतो.

हा पलायनाचा मार्ग त्याला साहित्याच्या आस्वादात सापडतो. साहित्यकृतीतून आविष्कृत होणाऱ्या विश्वाशी तो एकरूप होतो आणि त्याचे लौकिक विश्व विसरून जातो. त्या विश्वात त्याला त्याच्या अपुऱ्या राहिलेल्या लौकिक इच्छा पुऱ्या झाल्याचे जाणवू लागते. जी सुखस्वप्ने त्याने लौकिक जीवन जगताना मनाशी बाळगली होती त्यांची पूर्ती झाल्याचे त्याला साहित्य वाचताना वाटू लागते. त्यामुळेच माणसाला क्षणभर का होईना, आपले दुःख विसरायला लावण्याचे कार्य कलाकृती, साहित्यकृती करते. ती एक अननुभूत आनंद देते. हेच काव्याचे / साहित्याचे प्रयोजन होय, असे प्रा. ना. सी. फडके मानतात.

या सर्व प्रतिपादनाला एक मानसशास्त्रीय बाजूही आहे. दुःखमय अशा लौकिक जीवनापासून पलायन, काल्पनिक इच्छापूर्ती किंवा स्वप्नरंजन या सर्व मानसिक कृती आहेत. मानवी शरीराप्रमाणे मनावर लौकिक बंधने नसल्यामुळे मनाचे व्यापार हे स्वैर व आत्मनिर्भर असतात. परिस्थिती प्रतिकूल असली तरी मन अनुकूल भराऱ्या मारू शकते. इतकेच नव्हे, तर कल्पनेत त्या प्रतिकूलतेचे अनुकूलतेत रूपांतर करून त्यात रममाणही होऊ शकते. हे सर्व काल्पनिक खेळ असल्यामुळे त्यात अडथळा निर्माण होण्याचा संभवही नसतो. त्याच्या जोरावरच माणसाचे मन लौकिक जीवनात नेहमी अपुऱ्या राहणाऱ्या इच्छा काल्पनिक जीवनात पुऱ्या करून घेते. या मनोव्यापारास फ्राईड या सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञाने ' दिवास्वप्न ' (Day-dreaming) असे नाव दिलेले आहे. नेहमी माणसाला झोपेत स्वप्ने पडतात; पण अशी दिवास्वप्ने माणूस जागेपणी पाहू शकतो, अनुभवू शकतो. साहित्यास्वाद घेताना वाचक अशी दिवास्वप्ने न्याहाळीत असतो. त्या वेळी त्याला लौकिकाचा विसर पडलेला असतो आणि तो दुःखमुक्त होऊन इच्छापूर्तीचा वा स्वप्नरंजनाचा अनुभव घेत असतो असे मानसशास्त्राधारे सांगता व सिद्ध करता येते.

हे प्रयोजन लेखक व वाचकदृष्ट्या म्हणजे दोन्ही बाजूंनी लावता येईल असे आहे. वाचकदृष्ट्या तर त्याचे विवेचन वर केलेच आहे. लेखकदृष्ट्या पाहायचे झाल्यास लेखकही एक दुःखबद्ध माणूस आहे हे प्रथम लक्षात घ्यावे लागेल. त्याची धडपडही दुःखमुक्तीची असून तोही जीवनापासून पलायनाचा मार्ग शोधीत असतो. असा मार्ग त्याला साहित्यकृतीच्या निर्मितीत सापडतो. त्याद्वारा तो आपल्या अपुऱ्या इच्छांना पूर्तता देतो, किंवा स्वप्नांना गोचर साहित्यरूप देतो आणि त्यात स्वतः रममाण होतो.

मराठी साहित्यातील नाथमाधव या लेखकाचे याबाबतीत उदाहरण देता येईल. रायगड जिल्ह्यातील पनवेल गावचे गर्भश्रीमंत द्वारकानाथ माधव पितळे (म्हणजेच नाथमाधव) यांचे पूर्वायुष्य कलंदरपणे व्यतीत झालेले होते. एका शिकारीच्या प्रसंगी सिंहगडावर दरीत ते कोसळले आणि त्यांच्या कमरेखालचा भाग लुळा झाला. नंतरचे सारे आयुष्य त्यांना बिछान्यावर पडून घालवावे लागले. या दुःखी आयुष्यापासून पलायनाच्या प्रयत्नात त्यांना प्रथम वाचनाचा आणि नंतर लेखनाचा मार्ग सापडला. 'वीरधवल', 'रायक्लब अथवा सोनेरी टोळी' यांसारख्या स्वप्नरंजनात्मक कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी केले. सर्वसाधारणपणे लोकप्रिय साहित्याचे स्वरूप (Popular Literature) हे स्वप्नरंजनात्मक असते, प्रत थोडी वेगळी असेल, पण कालचे ना. सी. फडके आणि आजचे बाबा कदम, सुहास शिरवळकर यांच्यासारखे लेखक याच पंक्तीत बसतात.

असे असले तरी इच्छापूर्ती किंवा स्वप्नरंजन हे साहित्याच्या निर्मितीचे किंवा आस्वादाचे प्रयोजन म्हणता यायचे नाही. कारण लेखक किंवा वाचक फक्त या दोन गोष्टींचा हेतू मनात धरून साहित्याकडे वळतात आणि याद्वारा लाभणाऱ्या अभावात्मक, सवंग आनंदाची त्यांना अपेक्षा असते असे म्हणणे चुकीचे ठरेल. मराठीतील मोठमोठे लेखक, कवी, किंवा जागतिक साहित्यात ज्यांना मानाचे स्थान मिळाले आहे असे लेखक फक्त दुःखमुक्ती, इच्छापूर्ती वा स्वप्नरंजन या प्रयोजनाखातर लिहिते झाले असे म्हणणे अन्यायाचेच ठरेल. इथे असे म्हणता येईल की, दुय्यम दर्जाच्या लोकप्रिय साहित्यनिर्मिती व आस्वाद यांच्यामागे हे प्रयोजन असू शकेल; पण अभिजात साहित्याच्या व्यवहारात हे प्रयोजन संभवू शकत नाही.

दुसरे असे की, हे प्रयोजन पत्करल्याने साहित्याला लौकिक किंवा अगदी व्यावहारिक पातळीवरील दुःखमुक्तीचे एक साधन, असे स्वरूप प्राप्त होते. ते तर अमान्य करावे असेच आहे.

**५. मनोरंजन :** वर विवेचिलेल्या स्वप्नरंजन या प्रयोजनाबाबतचे बरेचसे विवेचन या प्रयोजनासाठी लागू पडणारे आहे.

माणूस म्हटला की त्याला मनोरंजनाची जरुरी भासणे, किंबहुना अशी भासणारी जरुरी हा माणूस आणि इतर प्राणिसृष्टी यातील महत्त्वाचा भेद आहे आणि म्हणूनच असे सांगितले जाते की, माणसाच्या या मानसिक गरजेतूनच साहित्यातील 'गोष्टी'सारख्या प्रकाराचा जन्म झालेला आहे. कुतूहल, उत्कंठा, गुंतागुंत यांचे ताण पेलणे आणि अखेरीस त्यातून सुटकेची स्थिती अनुभवणे यात माणसाच्या मनाला एक प्रकारचे समाधान लाभत असते. या सूत्राचेच बळ प्रारंभकाळातील आजीच्या गोष्टीमागे होते हे उघड आहे. तेव्हा रंजनाची गरज हा एक खास असा मानवी प्रवृत्ति-विशेष

होय. इतर प्राणिमात्रांना अशा रंजनाची कधी गरज भासताना दिसत नाही.

आजही या गरजेच्या तर्पणासाठीच गुप्तपोलिसांच्या चातुर्यकथेसारख्या साहित्याची निर्मिती होताना दिसते. ललितसाहित्याच्या सर्वच क्षेत्रात मनोरंजनपर साहित्याची निर्मिती प्रत्येक कालखंडात मोठ्या प्रमाणावर झालेली / होताना दिसते. घटकाभर करमणूक असेच याचे सर्वसाधारण स्वरूप दिसते. निवेदनातील गतिमानता, अंतरंगाची चमत्कृतिपूर्ण आकर्षकता आणि चटकदार सुबोधता हे अशा लेखनाचे विशेष बनलेले दिसतात. जीवनदर्शनाची खोली, उत्कटता आणि आविष्काराचे कलात्मक वजन इत्यादी वैशिष्ट्ये तिथे लक्षात घेतली जात नाहीत.

त्यामुळे मनोरंजन हे प्रयोजन लेखक वा वाचक यांच्या दृष्टीने सर्वच साहित्याला लावता येणारे नाही. शिवाय यातील 'रंजन' हा शब्द बराच गोंधळात टाकणारा आहे. त्याचे शब्दकोशातील अर्थ 'करमणूक', 'मौज', 'गाणे-सुभाषिते' इत्यादी विषयांमध्ये दंग असता उद्वेगादी दुःखांचा विसर पडून अन्तःकरणात होणारी सुखरूपता, 'आनंद', 'सुख' असे दिलेले दिसतात. त्यांचा काव्यार्थदृष्ट्या जाणवणारा सैलपणा उघड आहे. कारण मौज, सुख, किंवा करमणूक इत्यादी म्हटले तरी त्यांच्या संकल्पना जाणत्या व अजाणत्या माणसांच्या बाबतीत बदलत्या असतात; तसेच बाबूराव अर्नाळकर, गुरुनाथ नाईक, सुभाष शहा यांच्या गुप्तपोलिसी कथाकादंबऱ्या, ना. सी. फडके, बाबा कदम, सुहास शिरवळकर, चिंतामणी लागू यांच्या वाचकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन हिशेबाने बेतलेल्या कथाकादंबऱ्या आणि हरिभाऊ आपटे, श्री. ना. पेंडसे, भालचंद्र नेमाडे यांच्या कलात्मक म्हणू अशा कादंबऱ्या एका समान पातळीवरील करमणूक साधतात असे म्हणता येणार नाही. या तिन्ही ठिकाणी तीन भिन्न दर्जाच्या अभिरुचीचे तीन पातळ्यांवरील रंजन होताना दिसते.

तेव्हा मनोरंजन आणि वाङ्मयीन अभिरुची यातील संबंध महत्त्वाचा आहे. लेखक आणि वाचक या दोघांच्याही वाङ्मयीन अभिरुचीवर त्यांच्या रंजनाचे स्वरूप अवलंबून राहत असते. सवंग अभिरुचीशी समकक्ष होते ते सवंग रंजन आणि उच्च अभिरुचीशी समकक्ष होते ते उच्च दर्जाचे कलात्मक रंजन आहे.

सर्वसाधारणपणे मनोरंजनपर म्हटले जाणारे साहित्य दुय्यम दर्जाचे गणले जाते. कारण त्यात रंजनाच्या बेतलेल्या आडाख्यावर भर असतो. वाचकांची पसंती कशास मिळेल याचीच सतत जाणीव असते. निर्भेळ कलाविष्काराची ओढ त्यामागे नसते. म्हणून मनोरंजनाचे प्रयोजनसूत्र सर्वच ललितसाहित्य – निर्मितीमागे लावता येणार नाही; काही विशिष्ट 'मागणी तसा पुरवठा' या न्यायाने निर्माण होणाऱ्या ललितसाहित्यामागेच असे प्रयोजन लेखक व वाचक या दोन्ही बाजूंनी वास करते असे म्हणता येईल.

६. **विरेचन :** विरेचन ही एक फार जुनी संकल्पना आहे. ग्रीक शोकांतिकांचा विचार करीत असताना प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ व कलामीमांसक ॲरिस्टॉट्ल याने ती मांडलेली आहे. त्याने वापरलेला शब्द Katharsis - कॅथार्सिस, असा आहे. त्याच्या मते (ग्रीक) शोकांतिका वाचक-प्रेक्षकांना शेवटी दुःख देत नसून आनंदच देत असतात. (त्यामुळेच वाचक-प्रेक्षक त्यांचा पुन्हापुन्हा आस्वाद घेतो. दुःखच प्राप्त होत असते तर त्यांचा एकदा आस्वाद घेतल्यानंतर पुन्हा त्यांच्याकडे कुणी वळले नसते.) हा आनंद कसा प्राप्त होतो ? तर तो भावनांच्या विरेचनातून प्राप्त होतो. Katharsis मुळे प्राप्त होतो. Katharsis चा इंग्रजी पर्यायी शब्द Purgation हा असून; त्याचा मराठी पर्यायी शब्द विरेचन - निचरा होणे, साफ होणे असा आहे.

ॲरिस्टॉट्लच्या मते भावनांच्या विरेचनामुळे आपल्या चित्तवृत्तीत एक हल्लकपणा संभवतो. त्यामुळेच एक आनंद वा समाधान आपणास लाभते. भीती (Fear) आणि अनुकंपा (Pity) या माणसाचे मनःस्वास्थ्य बिघडवणाऱ्या भावना होत. शोकांतिका या भावनांचीच जागृती करते आणि माणसाच्या ठिकाणी वसणाऱ्या याच दोन भावनांच्या आधारे त्यांचा निचरा करून वाचक-प्रेक्षकांच्या मनाचा कोठा साफ करते. त्यायोगे मन स्वच्छ झाले की, माणसाच्या चित्तवृत्तींना एक आल्हाददायक हल्लकपणा येतो. शोकांतिकेत हीच प्रक्रिया घडते.

काट्याने काटा काढावा किंवा होमिओपाथी या वैद्यकशास्त्राप्रमाणे शरीराला त्रासदायक झालेली विकृती, त्याच विकृतीची औषधाद्वारा योजना करून शरीराबाहेर काढावी अशी विरेचनामागील कल्पना आहे, असे प्रसिद्ध आंग्लकवी मिल्टनसारख्यांचे मत आहे. (या संदर्भात तिसऱ्या प्रकरणातील 'प्रतिभाव्यापार आणि स्वप्नव्यापार 'मधील प्रिस्कॉट या मानसशास्त्रज्ञ समीक्षकाचे मतही मुद्दाम पाहावे.)

साहित्यात लौकिक भावभावनांशी संवादी आणि समांतर असणाऱ्या भावभावनांची चित्रणे असतात. त्यामुळे त्यांच्या आस्वादनात रंगलेल्या वाचकाच्या मनातही तशाच भावना जाग्या होतात. त्या लौकिक वा जीवशास्त्रीय नसल्यामुळे व्यवहारोपयोगी आणि कृतिशील नसतात. त्यांचे स्वरूप भावनेसाठी भावना असेच असते. आस्वादनातच त्यांचे तर्पण होत असल्याने त्या केवळ आस्वादनासाठीच असतात. (संस्कृत मतानुसार त्यांची ' चर्वणा 'च महत्त्वाची.) ही सर्व प्रक्रियाच ' आस्वादासाठी आस्वाद ' अशी असते. उदित झालेल्या भावभावनांचे आस्वादनातच तर्पण-विसर्जन होत जाते आणि त्यातूनच एक ' ऱ्हादैकमयी ' (केवळ आल्हाददायक) चित्तवृत्ती संभवते. अर्थात यासाठी भावनांचे विरेचन होणे आवश्यक; म्हणून विरेचन हेच साहित्यकृतीचे प्रयोजन अशी ही भूमिका दिसते.

ॲरिस्टॉट्लच्या कॅथार्सिसच्या संकल्पनेचा नेमका अर्थ लावण्यासंबंधीचे विद्वानांतील मतभेद बाजूस ठेवले, तरी 'विरेचन' हा साहित्याचा एक परिणाम आहे असे विचारांती दिसते आणि परिणाम व प्रयोजन या गोष्टी अलग आहेत ते आपण या आधी पाहिलेलेच आहे; तसेच अगदी ओढाताण करूनही विरेचनास साहित्याचे प्रयोजन मानणे कठीण आहे. कारण लेखक वा वाचक असा विरेचनाचा हेतू मनाशी धरून साहित्याकडे वळतो असे म्हणणे, साहित्याची प्रकृती लक्षात घेता मानणे कठीण आहे.

७. **जिज्ञासातृप्ती :** जिज्ञासा किंवा कुतूहल ही माणसाच्या ठिकाणची एक प्रबल अशी जन्मजात प्रेरणा आहे. सृष्टीतील प्रत्येक गोष्टीचे माणसाला नेहमीच कुतूहल वाटत आलेले आहे. त्याने त्यापोटीच कल्पनेच्या जोरावर सृष्टीचे रहस्य शोधण्याचा त्याच्या परीने आजवर सतत प्रयत्न केलेला / चालविलेला आहे. म्हणूनच अशा मानवी कुतूहलाच्या प्रेरणेला नवनवीन शोधांची जननी असे म्हटले जाते. मानवेतर प्राण्यांत असे कुतूहल दिसून येत नाही.

या जिज्ञासेमुळे माणूस जसा जीवनव्यवहाराकडे वळतो, त्याची संगती लावण्यात जास्त जास्त रस घेऊ लागतो; तसेच कलाव्यवहाराचेही आहे. तो त्याकडेही अशा जिज्ञासेपोटीच वळतो आणि त्यात रमत जातो. कारण सर्व विश्वाच्या आकलनाचीच जिज्ञासा त्याच्या ठायी वसत असते आणि आहे ते जीवन असमाधान देणारे म्हणून ते बदलून त्याच्या जागी नवे विश्व उभे करण्याची प्रेरणा म्हणजे नवनिर्मिती, असे डॉ. स. रा. गाडगीळ म्हणतात.

माणूस कोणत्याही सामाजिक स्तरावरील का असेना, त्याच्या एकूण जीवनाची कक्षा नेहमीच मर्यादित असते. त्यामुळे त्याच्या अनुभवांनाही मर्यादा पडतात. जे जाणून घ्यायची जिज्ञासा असते ते त्याच्या वाट्याला आलेल्या जीवनातील अनुभवात बसत नाही. शहरी माणसाला ग्रामीण वा आदिवासी जीवनाचा अनुभव सदैव परकाच असतो. उलटही असेच असते. तेव्हा एका बाजूला जीवनाच्या समग्र आकलनाची इच्छा आणि दुसऱ्या बाजूला मर्यादित जीवनाची प्राप्त कक्षा यांच्या कोंडीत माणूस सदैव सापडलेला असतो.

जसे प्रत्यक्ष जीवनानुभवाबद्दल हे दिसते तसेच मानवी मनाबाबतही म्हणता येते. मानवी मन हे माणसाला पडलेले एक नेहमीचे कोडे आहे. मनाच्या एकूण स्वरूपात ज्ञात दालनापेक्षा अज्ञात दालनेच जास्त आहेत आणि या मनाची रचना कमालीची गुंतागुंतीची असून, ती अनाकलनीय म्हणावी अशीच आहे, याची माणसाला कल्पना आहे.

तेव्हा वैचित्र्यपूर्ण आणि विविधतापूर्ण असे मानवी जीवन व मन, त्यांची अनाकलनीयता याबद्दलचे कुतूहल माणसाला वाटले नाही तरच नवल! अशा जिज्ञासातृप्तीसाठी साहित्य उपयोगी पडते. यामुळेच साहित्याचे जिज्ञासातृप्ती हे प्रयोजन सांगितले जाते. हे प्रयोजन प्रामुख्याने वाचकदृष्ट्या मानावे लागते.

या संदर्भात शॉपेनहोअर या जर्मन तत्त्वज्ञाचा उल्लेख करायला हवा. माणसाच्या मर्यादित जीवनात सर्वच गोष्टींचे आकलन होऊ शकत नाही. समजाव्यात अशा वाटणाऱ्या गोष्टींबद्दलची त्याची जिज्ञासा तशीच राहते. या जिज्ञासेची तृप्ती साहित्याद्वारा होते असे त्याचे मत आहे. ललितसाहित्यामुळे आपणास अपरिचित आणि आपल्या अनुभवक्षेत्राबाहेरील मानवी जीवनाची आणि मानवी मनातील अज्ञात सूक्ष्मातिसूक्ष्म छटांची आपणास माहिती होते हे खरे आहे. ना. सी. फडके यांच्या 'अस्मान', 'तुफान' आणि 'शोनान' या तीन कादंबऱ्यांमुळे ब्रह्मदेश आणि भारताच्या स्वातंत्र्याकरिता सुभाषबाबूंनी आझाद हिंद सेना उभी करून केलेले प्रयत्न तपशिलासह समजतात. ॲलन पेटन या कादंबरीकाराच्या 'Cry, my beloved country' या कादंबरीमुळे दक्षिण आफ्रिका या देशातील काळा-गोरा भेद, तेथील वर्णविद्वेषाचे स्वरूप आपणास समजते; किंवा 'पण लक्षात कोण घेतो ?' या हरिभाऊंच्या कादंबरीमुळे गेल्या शतकाअखेरच्या रूढिग्रस्त मराठी समाजाची व पांढरपेशा स्त्रीची दयनीय स्थिती समजून येते. या सर्व गोष्टी स्वतंत्रपणे समजून घ्यायच्या तर माणसाला अनेक ग्रंथ वाचावे लागतील आणि दीर्घकाल ज्ञानोपासना करावी लागेल. इथे रमतगमत हे सारे ज्ञान आपणास मिळते आणि आपले त्याविषयीचे कुतूहल शमू शकते.

याबरोबरच 'वज्राघात' कादंबरीतील रामराजा, 'एकच प्याला' नाटकातील सिंधू-सुधाकर-तळिराम, 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकातील पितापुत्र शिवाजी-संभाजी, 'गारंबीचा बापू' या कादंबरीतील बापू-अण्णा खोत-राधा-यशोदा इत्यादी किती किती तरी व्यक्तिचित्रणांतून मानवी मनाचे आपल्याला अज्ञात असलेले असंख्य पैलू दिसून येतात. तेही पुन्हा रमतगमत अशा केलेल्या आनंददायी वाचनातून. एरवी मनाचे व्यवहार समजून घ्यायच्या कुतूहलापोटी मानसशास्त्रावरील कितीतरी ग्रंथ चिकाटीने वाचावे लागले असते.

तेव्हा वाचकाची जिज्ञासातृप्ती साहित्याद्वारा होते हे खरे; पण अशा जिज्ञासातृप्तीसाठीच लेखक लिहितो आणि वाचक साहित्य वाचतो असे म्हणणे योग्य होणार नाही. म्हणजे जिज्ञासातृप्तीस प्रयोजन म्हणता येणार नाही. तो वाटल्यास साहित्याचा एक आनुषंगिक उपयोग म्हणता येईल.

अशा गोष्टींबद्दल जिज्ञासा असणारा वाचक ललितसाहित्याकडे वळण्यापेक्षा

त्या त्या शास्त्राकडे वळेल हेच जास्त सयुक्तिक वाटते. मराठ्यांच्या इतिहासाबद्दल कुतूहल असणारा वाचक ऐतिहासिक कथा-कादंबरी-नाटक यांच्याकडे वळण्यापेक्षा राजवाडे-खरे, शेजवलकर-सरदेसाई या इतिहास- संशोधकांच्या लेखनाकडेच वळेल!

आणखी एक बाब याबाबतीत लक्षात घ्यावी लागेल. जिज्ञासा ही एक वैचारिक, ज्ञानात्मक जाणीव आहे. तिची एकदा तृप्ती झाली की, माणूस पुन्हा त्या मार्गाकडे वळत नाही. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धान्त एकदा नीट समजून वाचला की, पुन्हा त्याचे वाचन करण्याची जरुरी भासत नाही; पण एखादी साहित्यकृती आपण पुन्हा पुन्हा वाचतो. जिज्ञासातृप्ती हे प्रयोजन असते तर एकदा वाचलेले पुस्तक पुन्हा वाचले गेले नसते; पण पुनर्वाचने सतत होताना दिसतात. म्हणून जिज्ञासातृप्ती हे प्रयोजन मानता येत नाही.

मम्मट या संस्कृत मीमांसकाने सांगितलेले 'व्यवहारज्ञान' हे प्रयोजन जिज्ञासातृप्तीशी मिळतेजुळते आहे, तसेच लागू न पडणारेही आहे.

**८. उद्बोधन :** प्रयोजन म्हणून मानल्या जाणाऱ्या उद्बोधन या शब्दाचा मुख्य घटक 'बोध' हा शब्द आहे. त्यामुळे प्रथमदर्शनीच साहित्य आणि बोध यांचा संबंध नजरेसमोर येतो.

साहित्यातून बोध करावा का, किंवा साहित्य व बोध यांच्यात नेमका संबंध काय आहे, असा प्रश्न आपोआपच यातून निर्माण होतो. या प्रश्नाची चर्चाही जुन्या काळापासून होत आलेली आहे. बोधाचे स्वरूप नेहमीच उपदेशाचे असे मानले गेल्यामुळे, साहित्याकडून बोधाची अपेक्षा केल्यास लेखकाची भूमिका आपोआप उपदेशकाची बनते. त्यामुळे त्याची निर्मात्या कलावंताची भूमिका धोक्यात येते; तसेच बोधाचा निकटत्वाने नीतीशी, चांगल्या-वाईटाच्या कल्पनेशी संबंध येतो. आचार व विचार या दृष्टीने चांगले किंवा उपकारक असा नीतीचा अगदी स्थूल अर्थ घेतला तरी हा अर्थ स्थळ-काळ-व्यक्तिसापेक्ष असल्यामुळे अडचणी वाढतच जातात. कारण एका काळातील आणि स्थळातील नीतिकल्पना दुसऱ्या काळात व स्थळात बदललेल्या दिसतात; तसेच त्या व्यक्तिनुरूप, त्यांचा व्यवसाय, त्यांचा सामाजिक दर्जा यानुसारही बदलताना दिसतात. तेव्हा इतक्या बदलत्या गोष्टींवर भिस्त ठेवून त्यांच्या अस्थिर व्यवहारात साहित्याने पडू नये असे सांगण्यात येते. ही सर्वसाधारणपणे कलावादी भूमिका झाली. उलट साहित्याचे किंवा कलेचे स्वरूप जीवनाला मार्गदर्शक / उपकारक असायला हवे, तोही एक जीवनान्तर्गत व्यवहार असल्यामुळे त्याचे स्वरूप जीवनविन्मुख किंवा जीवनास अपकारक असता कामा नये, असे जीवनवादी भूमिकेवरून सांगण्यात येते. जीवनवाद्यांच्या मते नीती ही संकल्पना बदलणारी नसते. तत्त्व म्हणून नीती,

नीतिमत्ता ही संकल्पना सदासर्वकाळ सर्वत्र सारखीच असते. तिच्याशी निगडित अशा तपशिलात काही फरक पडत जातात वा बदल होत जातात इतकेच! साहित्याने अगर कलेने या तपशिलात गुंतू नये. तिने नैतिक म्हटल्या जाणाऱ्या तत्त्वांचा पाठपुरावा करावा.

या दोन टोकांच्या भूमिकांतून एक मध्यम मार्ग काढला जातो. हे दोन्ही आग्रह बाजूला ठेवून असे म्हटले जाते की, कलेद्वारे बोध करावाच किंवा करू नये असे नाही. तो केलाच तर त्याचे स्वरूप अप्रकट असावे. म्हणजे साहित्याचे साहित्यत्व अबाधित राखून बोध करायचा तर तो छुप्या रीतीने करावा. त्याचे स्वरूप साखरेचा लेप दिलेल्या कडू कोयनेलच्या गोळीसारखे असावे, असे 'विदग्ध वाङ्मय' या निबंधात हरिभाऊ आपटे यांनी म्हटले आहे. त्या गोळीचा कडूपणा जसा साखरेच्या लेपामुळे गिळणाऱ्याला जाणवत नाही आणि पोटात गेल्यावर विकृती नाहीशी करणे त्या गोळीला जमते; तसेच साहित्यातील बोधाचे असावे. बोध किंवा उपदेश यांचा 'कडवटपणा' स्वतंत्रपणे वाचकाला जाणवू नये. (कारण माणसाला जात्याच बोध आणि उपदेश आवडत नसतात.) यामुळे लेखकाची लेखक ही भूमिकाही धोक्यात येत नाही. तो उघड उघड उपदेशक बनत नाही. हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्या हे याचे उत्तम उदाहरण आहे. आगरकरांचा स्त्री-सुधारणावाद त्यांच्या कादंबऱ्यांत ग्रथित केला गेला आहे; पण तो प्रकट न ठेवता छुपा वा अप्रकट ठेवला गेला आहे. त्या काळच्या आगरकर नाकारणाऱ्या समाजानेही म्हणूनच हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचे कौतुक करून स्वीकार केला.

'उद्‌बोधन' या शद्बाचा अर्थ मात्र व्यापक आहे. उत्+बोधन याचा अर्थ intensive awakening असा आहे. खोल, समृध्द आणि व्यापक अशी जागृती असा त्याचा अर्थ सांगता येईल.मानवी मन आणि जीवन हेच लक्ष्य असल्यामुळे त्यांच्या विविध अंगांचे दर्शन साहित्यातून होत असते. लेखकाचा दर्जा जितका मोठा असेल तितकी या दर्शनाची सूक्ष्मता, खोली व व्याप्ती मोठी असते. किंबहुना साहित्यकृतीद्वारा घडविल्या जाणाऱ्या अशा दर्शनाच्या वैशिष्ट्याधारेच लेखकाची योग्यता ठरविली जाते. असे लेखन वाचकाच्या ठिकाणी जीवनाविषयीची एक समृध्द जाणीव विकसित करीत जाते. त्यातूनच वाचकांच्या मनाचे उद्‌बोधन साधले जाते. कलावंताच्या सुजाण मनाने लावलेला जीवनाचा प्रगल्भ अर्थ साहित्यकृतीद्वारा वाचकांच्या मनात संक्रान्त होतो आणि त्या मनालाही प्रगल्भ करतो. रामायण - महाभारतासारख्या पुरातन कृती हेच साधतात असे म्हटले जाते. त्याच नव्हे, तर टॉल्स्टॉयची 'वॉर ॲण्ड पीस', डोस्टोव्हस्कीची 'ब्रदर कारोमान्झो', बोरीस पास्टरनाकची 'डॉ. झिवागो',

हेमिंग्वेची ‘ ओल्ड मॅन ॲण्ड दि सी ’ यासारख्या सर्व जगाने मानलेल्या अर्वाचीन साहित्यकृतीही याचीच उदाहरणे म्हणून सांगण्यात येतात.कालिदास, भवभूती, शेक्सपीअर, इब्सेन यांच्या नाटकांचाही या संदर्भात उल्लेख करता येईल.

साहित्याने उद्बोधन होते आणि तेही मम्मट हा संस्कृत मीमांसक म्हणतो त्याप्रमाणे पत्नीने केलेल्या रोचक उपदेशातून ते होते हे मान्य केले, तरी त्याला प्रयोजनाचे स्थान देण्यात अडचणी निर्माण होतातच. लेखकदृष्ट्या वा वाचकदृष्ट्या हे प्रयोजन मानता येईल असे वाटत नाही. कारण वाचकांचे उद्बोधन करण्यासाठी लेखक लिहितो असे म्हणणे जितके गैर ठरेल, तितकेच वाचक आपले उद्बोधन व्हावे म्हणून साहित्य वाचतो असे म्हणणेही गैर ठरेल. उद्बोधन हाही शेवटी साहित्याचा एक व्यापक परिणामच आहे असे म्हणावे लागते.

**९. प्रचार :** प्रचार या प्रयोजनाचे स्वरूप थोडयाफार अर्थाने ‘ बोधा ’सारखेच आहे. तिथे लेखक कलावंत न राहता ‘ बोधवादी उपदेशक ’बनतो हा धोका; तर इथे तो ‘ प्रचारक ’ बनतो हा धोका.

स्वतःला प्रतीत झालेल्या सत्याचा किंवा स्वतःला मान्य झालेल्या तत्त्वाचा प्रचार करण्यासाठी लेखक लेखन करतो असे एक मत दिसते. त्या मागे लेखकाने असे करावे अशी अपेक्षा असते. यामुळे साहित्याला साधनाचे स्वरूप प्राप्त होते. रशियामध्ये स्टालिनच्या राजवटीत साहित्याच्या बाबतीत (‘Social Realism’) सामाजिक वास्तववाद किंवा साम्यवादी वास्तववाद या कल्पनेचा उदय झाला आणि नंतर त्याचा आग्रहही धरण्यात येऊ लागला. मग ‘ प्रचारा ’ला प्रयोजनाची आपोआप प्रतिष्ठा प्राप्त झाली. तिथे साम्यवादाचा प्रचार आणि प्रसार हेच साहित्यनिर्मितीचे प्रयोजन मानण्यात येऊ लागले. साहित्याला साधनाचे स्थान दिले गेले; त्याबाबतही weapon theory म्हणजे एक ‘ हत्यारा ’चा सिध्दान्तच तयार झाला. समतेवर आधारलेल्या ज्या शोषणरहित, वर्गरहित समाजाची उभारणी साम्यवादास अभिप्रेत आहे त्यासाठी समाजातील प्रत्येक चीज म्हणजे वापरावयाचे हत्यार आणि साहित्य हेही एक असेच हत्यार, असे या सिद्धान्ताचे स्वरूप आहे.

साहित्याच्या साधनात्मकतेबरोबरच सहेतुकता हाही अशा साहित्याचा विशेष बनतो. विशिष्ट हेतू मनात धरून साहित्याची निर्मिती होत जाते आणि बहुतांशी असा हेतू कलाबाह्य किंवा साहित्यबाह्य असून, केवळ अभिप्रेत अशा जीवनाच्या स्वरूपाशी संलग्न असतो. रशियात साम्यवादी समाजरचना हा मानला गेलेला हेतू साहित्यबाह्यच होय. साहित्य बनले ते या हेतूच्या प्रसाराचे साधन.

सहेतुकतेमुळे विशिष्ट तऱ्हेने साहित्यकृती बेतणे क्रमप्राप्त होते. मग तिचे स्वरूप

SENIOR 45665

यांत्रिक व हिशेबी होऊ लागते. आशय आणि आविष्कार यांच्यातील लवचिकपणा नष्ट होतो. त्यातील सूचकता, अनेकार्थता, विशिष्ट घाट, लेखन - सौंदर्य इत्यादी कलात्मक म्हटले जाणारे विशेष धोक्यात येतात.

अशा साहित्याबद्दलची फार मोठी अडचण म्हणजे ते फार मोठ्या प्रमाणात स्थल-काल-तत्त्वसापेक्ष बनत जाते.त्यात सार्वत्रिक अशी आवाहनक्षमता निर्माण होत नाही. त्यामुळे प्रचार हे साहित्याचे (लेखकनिष्ठ) प्रयोजन मानले, तर साहित्याचे साहित्यत्वच धोक्यात येते; पण प्रचाराची वेसण कलेच्या हाती ठेवली गेली की, यातील अडचणींचे उच्चाटन झाले नाही तरी बऱ्याच प्रमाणात निराकारण होऊ शकते. साहित्यकृती हेच साध्य राहिले, लेखकाच्या अनुभवालाच प्रधान स्थान मिळाले तर साहित्यकृतीचे ' साहित्यत्व 'कायम राहून प्रचारही साधला जातो असा कलाविश्वातील प्रकार दिसतो. नामदेवास भागवतधर्माचा प्रचारक व प्रसारक म्हटले जाते. आपल्या अभंगांद्वारे त्याने हे काम प्रामुख्याने केले असे सांगण्यात येते.आज असे दिसते की, त्याने त्याच्या अभंगरचनेचे कलारूप सुरक्षित राखूनच हे कार्य केलेले आहे. आजचे दलित साहित्य सामाजिक अन्याय वा विषमता-विरोधी तत्त्वांचा प्रचार करणारेच साहित्य आहे. दलित समाजाने शेकडो वर्षे सहन केलेल्या अन्यायालाच ते वाचा फोडते आहे; पण बाबूराव बागूल, दया पवार, केशव मेश्राम इत्यादी लेखकांनी कलेचा बाज चांगलाच राखला आहे. यात नामदेव ढसाळांसारख्या कवीने मोठीच मोडतोड केलेली असली तरी त्यांचे लेखन कविताच नव्हे असे म्हणता येणार नाही.नारायण सुर्वे यांच्या कवितेतही साम्यवाद त्यांच्या काव्यानुभवाचा घटक बनूनच व्यक्त होताना दिसतो. तो उपरा वाटत नसल्याने त्यांच्या कवितेवर प्रचारी साहित्याची सवंग कळा येत नाही. गो.पु.देशपांडे यांचे ' उद्ध्वस्त धर्मशाळा 'सारखे नाटकही साम्यवादाबाबतच्या एका समंजस व जीवनानुगामी भूमिकेचीच मांडणी करते. सांकेतिकता झुगारलेली असली तरी नाटकाचे तंत्र त्यात चांगल्या तऱ्हेने सांभाळले गेले आहे.

आपल्याला प्रतीत झालेल्या सत्याचा प्रचारच साहित्यकृतीद्वारा लेखक करीत असतो असे म्हणायचे झाले, तर व्यापकार्थाने प्रचार हे लेखकदृष्ट्या प्रयोजन मानता येईलही. पण हा नुसता व्यापकार्थ होणार नाही, तर फार ताणलेला कृत्रिम अर्थ होईल. लादलेला अर्थ होईल, कारण मग प्रचार व आविष्कार हे दोन शब्द समानार्थक मानावे लागतील. तेव्हा असा अर्थ या संदर्भात न घेणेच योग्य ठरेल. आविष्कारात लेखकाचे व्यक्तिमत्त्व शाबूत असते आणि प्रचारात परतंत्रतेमुळे ते साचेबंद होते हेही इथे लक्षात ठेवले पाहिजे. भारतातील निवडणुकांच्या वेळी भिन्न भिन्न पक्षांकडून प्रचाराच्या वेळी म्हटली जाणारी पदे प्रचारी साहित्याचे सर्वपरिचित उदाहरण म्हणता येईल. काँग्रेसच्या

वतीने महाराष्ट्रात प्रसिद्ध कवी ग.दि.माडगूळकर यांनी मुद्दाम तयार केलेली पदे म्हटली जात. त्यात काँग्रेसचा प्रचार जरूर असे, पण 'कवी माडगूळकर' नसत!

**१०. अनुभवविश्वाची समृद्धी :** अनुभवविश्वाची समृद्धी हे तसे वाचकनिष्ठ मानता येईल असे प्रयोजन आहे. एका दृष्टीने ते लेखकनिष्ठही मानता येईल. कलाकृती हा एक आत्मशोध आहे असे म्हटले जाते. तेव्हा लेखकदृष्ट्या कलाकृती, तिची निर्मिती ही एक आत्मशोधाची प्रक्रिया बनते. आपल्या अनुभवांच्या निमित्ताने लेखक स्वतःच्या अस्तित्वाचाच शोध घेऊ पाहतो. अशा तऱ्हेने घेतला जाणारा शोध म्हणजेही एक आत्मविषयक अनुभवांची मालिकाच बनत जाते. व्यक्तीच्या आत्मरूपाची संमिश्रता किंवा व्यामिश्रता लक्षात घेतली तर तिचा शोध घेऊ पाहणारा कलावंत आत्मरूपाची अज्ञात दालने ओलांडीत जातो आणि परिणामी अशा आत्मानुभवामुळे स्वतःच अनुभवदृष्ट्या अधिकाधिक समृद्ध होत जातो हे लक्षात येते. वरवर पाहता परिचित वाटणारे आत्मरूप शोधासाठी समोर ठेवले की, उलगडल्या जाणाऱ्या प्रत्येक पापुद्र्याचा अनुभव ते अपरिचित असल्याची जाणीवच देत जातो आणि ही जाणीवच एक समृद्धी देते.

अनुभवाच्या अर्थरूपाची प्रत्येक शक्यता म्हणजे आत्मरूपाचीच एकेक प्रतीती असते, नवा अनुभव असतो. अशा तऱ्हेने अनुभवविश्वाची समृद्धी हे लेखकनिष्ठ प्रयोजन होऊ शकते.

वाचकदृष्ट्या साहित्यातून संभवणारी अनुभवविश्वाची समृद्धी लक्षात येण्यासारखी आहे. आत्माविष्कार, जिज्ञासातृप्ती, उद्‌बोधन यांसारख्या प्रयोजनांबद्दल याआधी जे लिहिले आहे तेही इथे लक्षात घेता येईल. प्रा.ना.सी.फडके सांगत असलेला पुनःप्रत्ययसुद्धा वाचकांचे अनुभवविश्वच समृद्ध करीत असतो. साहित्यकृतीचा वाचकाकडून घेतला जाणारा प्रत्येक आस्वाद हा एक नवा अनुभव असतो. तो वाचकाच्या व्यक्तिमत्त्वात विलीन होतो आणि आपोआपच त्याच्या व्यक्तिमत्त्वाची कक्षा रुंदावत जाते. ललितेतर साहित्याच्या वाचनाने त्याच्या ज्ञानात भर पडते, पण ललितसाहित्याच्या वाचनाने त्याच्या मनाची मूसच संपन्न होत असते. शिवाय ती ललितसाहित्यकृती ओळखीची म्हणजे वाचलेली आहे की नाही हा प्रश्नही उद्‌भवत नाही. वाचनाचे फायदे सांगताना गोपाळ गणेश आगरकरांनी 'वाचनामुळे माणूस जुना राहत नाही, नवा बनत जातो' असे जे म्हटले आहे ते अनुभवविश्वाच्या समृद्धीच्या सूत्रालाही लागू पडते.

ही अनुभवविश्वाची समृद्धी हेतुपूर्वक नसते हा तिचा एक विशेष. म्हणजे जिज्ञासेसारखे व्यापक व ज्ञानात्मक सूत्रही त्यामागे नसते. साहित्याच्या लेखन- वाचनाद्वारा ही समृद्धी आपोआप होत जात असते. मात्र ती होण्यासाठी लेखन-वाचन होत नाही.

समृद्धीचे स्वरूप गुणात्मक व संख्यात्मक असे दुहेरी असते. तशा या दोन्ही गोष्टी साहित्यात साधल्या जातात. खोली, उत्कटता इ. गुणात्मक भाग आणि अपरिचित विश्वाचे चित्रण हा संख्यात्मक भाग त्यात येतो. हे सूत्र कलावादी व जीवनवादी अशा दोन्ही भूमिकांना लागू पडते. अनुभवविश्वासाठी अनुभवविश्व असे कलावादी म्हणतील, तर विविधतापूर्ण जीवनदर्शनावर जीवनवादी भर देतील. अशा दोन टोकांची विचारसूत्रे हाताशी घेऊन ते दोघेही पोहचतील मात्र एकाच निष्कर्षावर. तो म्हणजे 'व्यक्तिमत्त्व समृद्ध व संपन्न होणे', आणि ही गोष्ट ललितसाहित्यामुळे होते.

**११. स्व-रूपनिष्ठा :** स्वतःच्या रूपाशी निष्ठा हे प्रामुख्याने कलावादी भूमिकेतून मांडले जाणारे आजचे प्रयोजन आहे. साहित्यकृती म्हणजे एक भाषिक संघटना अशी भूमिका घेऊन तिच्या रूपसिद्धीची तपासणी केली जाते. अनुभूतीने घेतलेले कलात्मक गोचर रूप म्हणजेच कलाकृती - साहित्यकृती होय. या रूपाची बीजे त्या त्या अनुभूतीतच समाविष्ट झालेली असतात. अशी अनुभूती आणि त्यातच दडलेली व तिचा आविष्कार साधताना विकसित होत जाणारी रूप - बीजे यांच्याशी एकनिष्ठा हे साहित्यनिर्मितीचे व आस्वादाचे मानले जाणारे एक प्रयोजन आहे. निर्मितीच्या वेळी रसिकाभिरुची किंवा खुद्द लेखकाला आवडणारे शद्ब, कल्पना वगैरेबद्दलचे संभवनीय मोह यांच्याशी कसलीही तडजोड करणे यात बसत नाही. आस्वादाच्या वेळीही साहित्यकृतीबाह्य अशा कसल्याही तडजोडी वाचकाने करणेही यात बसत नाही.

'Fidelity to its own nature'अशी या प्रयोजनाबाबतची इंग्रजी शब्दयोजना केलेली दिसते. तिचा अर्थ स्व - रूपाशी, स्व-भावाशी निष्ठा किंवा प्रामाणिकपणा असाच होतो. यादृष्टीने प्रस्तुत प्रकरणाच्या प्रारंभी साहित्याचे स्वरूप आणि प्रयोजन यांच्या परस्परसंबंधाबद्दल केलेले विवरण लक्षात घेता येईल. ते मार्गदर्शकही ठरेल.

'स्वतःच्या प्रकृतिधर्माशी इमान राखणे हेच काव्याचे मूलभूत व प्रमुख प्रयोजन होय,' असे वेलेक आणि वॉरेन यांनी सांगितल्याचा उल्लेख मागेच आलेला आहे. प्रा.वा.ल.कुलकर्णी यांची मतेही दिलेली आहेत. ते सर्व या संदर्भात पाहता येईल.

तेव्हा साहित्यकृतीची साहित्यकृती म्हणून असणारी जी स्वतंत्र प्रकृती आहे तिच्याशी एकनिष्ठ राहणे, तिच्या सत्त्वाचा शोध घेणे हे लेखक व वाचक या दोन्ही भूमिकांतून प्रयोजन ठरते. मात्र यात साहित्यनिर्मितीबाबत योजिले जाणारे तंत्र, शैली, त्यांच्या द्वारा साधले जाणारे जीवनदर्शन किंवा तिचे संभवणारे अनेक उपयोग वा परिणाम इत्यादी गोष्टी लक्षात घेतल्या जात नाहीत. कारण या गोष्टी लक्षात घेतल्यास साहित्यकृतीच्या सत्त्वास भिडणे किंवा तिचा शुद्ध आस्वाद घेणे संभवू शकत नाही. इतर गोष्टीतच आपण गुंतून पडतो. इतिहासातले नाना फडणवीस मनाशी धरून विजय

तेंडुलकरांच्या 'घाशीराम कोतवाल' या नाटकाचा शुद्ध आस्वाद शक्य नाही, असे सांगितले जाते.

प्रस्तुत प्रयोजन हे प्रत्येक साहित्यकृतीचे स्वतंत्र अस्तित्वच लक्षात घेते. कांट, क्रोचे यांसारख्या सौंदर्यशास्त्रज्ञांनी प्रत्येक कलाकृती ही अनन्यसाधारण असते, तिच्या घडणीचे नियम तिचे खास स्वतःचे असतात आणि या नियमांचा साचा व नमुना निर्माण होऊ शकत नाही असे सांगितले आहे. कलानिर्मितीमागील प्रातिभा ज्ञानावर क्रोचेने फार भर दिलेला आहे; तसेच साहित्याची कथा, काव्य, कादंबरी इत्यादी प्रकारात केली जाणारी विभागणीही क्रोचेला अमान्य आहे. तो प्रत्येक कलाकृती / साहित्यकृती ही जशी स्वतंत्र व अनन्यसाधारण मानतो तशीच ती फक्त निर्मिती, एक रचना आहे असे मानतो. प्रकारातील वर्गीकरण हे त्या रचनेवर लादलेले असते असे त्याचे मत. म्हणून प्रकारगत विभागणी त्याला अन्याय्य व कृत्रिम वाटते. म्हणून प्रकारगत निकषही या प्रयोजनाच्या संदर्भात महत्त्वाचे मानले जात नाहीत. प्रत्येक कलाकृतीचे सत्त्व वेगळे, तिची रूपसिद्धी वेगळी, तिच्या घडणीचे कायदेकानू वेगळे अशी इथे धारणा असते. कोलरिज ज्याला Intrinsic merit of a piece of art म्हणजे कलाकृतीची आंतरिक गुणवत्ता म्हणतो तिच्यावरच इथे सारी भिस्त असते.

निर्मितीच्या बाबतीत जसे साहित्यकृतीच्या स्वरूपाचे भान किंवा स्वरूपाची सिद्धी हेच प्रयोजन लेखकाच्या बाबतीत असते असे म्हटले जाते, तसेच आस्वादाच्या बाबतीतही याच गोष्टीची प्रतीती तपासली जाते. तेव्हा कलेच्या बाबतीतील अलौकिकतावादात मोडणारे हे प्रयोजन होय.

येथवर आपण साहित्याची काही प्रयोजने पाहिली. त्यांचा लेखक आणि वाचक या दोन्हींच्या दृष्टीने विचारही केला; तसेच जरूर तेथे कलावादी आणि जीवनवादी भूमिकांतूनही त्यांची पाहणी केली.

इथे जाता जाता फक्त एका नव्या गोष्टीचा उल्लेख करायचा आहे. 'सौंदर्यमीमांसा' या ग्रंथात रा. भा. पाटणकर यांनी अलौकिकतावादी आणि लौकिकतावादी अशी कलेची एकूण संकल्पनाच द्विध्रुवात्मक असल्याचे स्पष्ट केले आहे. यातील अलौकिकतावाद हाच कलावाद आणि लौकिकतावाद हा जीवनवाद होय. साहित्य ही आशयप्रधान कला असल्याने तिच्यात काही इतर ललितकलांप्रमाणे निर्भेळ अलौकिकतावाद वा कलावाद येणे अशक्य आहे. आशयाचा विचार हा परिणामी जीवनाचा, जीवनानुभवाचाच विचार होतो. तेव्हा साहित्याच्या बाबतीत कलावादी विचारालाही, त्याच्या कलाने का होईना, पण जीवनाचा विचार हा करावाच लागतो.

प्रयोजन-विचारातही याचे म्हणूनच प्रतिबिंब पडलेले आढळते.

तसेच प्रयोजनात अनेकविधता असली तरी शेवटी त्यांची परिणती मात्र एकाच मानसिक अवस्थेत अपेक्षित असते आणि ही एका उच्चतर आनंदाची अवस्था होय. तिला वेगवेगळ्या लोकांनी वेगवेगळ्या तऱ्हेने संबोधले आहे इतकेच! 'कांट' 'disinterested joy' (निरभिलाष आनंद) म्हणतो, अभिनवगुप्त 'विश्रांतिकारिणी' म्हणतो, तर आय. ए. रिचर्ड्स् 'सायनेस्थिशिया' म्हणतो. लेखकाच्या दृष्टीने निर्मितीचा उच्चतर आनंद, तर वाचकाच्या दृष्टीने आस्वादाचा उच्चतर आनंद असे त्याचे दुहेरी स्वरूप आहे. म्हणून 'उच्चतर आनंद' हेच साहित्याचे एक सर्वमान्य प्रयोजन म्हणता येईल असे वाटते. कारण या आनंदाचे स्वरूप परिणामासारखे नसते, किंवा ज्यासाठी साहित्यव्यवहार मुद्दाम केला जातो असाही हा आनंद नसतो. ही एक सुखदुःखातीत अशी मानसिक अवस्था असते.

• • •